## महिन्याचा विचार

''शरण''जाणे केव्हाही सोप्पे! कायम कणा ताठ ठेवून चालणे हा भ्रम असतो. आग हळूहळू शांत होते आणि त्यावर स्वत:च्या अहंकाराची राख साचत जाते. हे टाळण्यासाठी गुरूदेवांनी एक सुंदर पद्धत विकसित केलेली होती. ते सतत ''शरणागत'' मंत्राचे पठण करीत असतं.

''हरी शरणं मम्<br>
श्रीकृष्ण शरणं मम्<br>
श्री राम शरणं मम्<br>
दुर्गा देवीम शरणं प्रपद्ये<br>
श्रीमन-नारायण चरणौ शरणं प्रपद्ये''<br>
आणि गीतेच्या १८ व्या अध्यायातील ६६ वा श्लोक-<br>
सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।<br>
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच:।।<br>
(सर्व कर्तव्यांच्या त्याग कर आणि केवळ माझ्या पावलांशी आत्मसमर्पण कर. मी तुला पापमुक्त करीन.)

### बहिरंग साधना

(ईश्वर सान्निध्याचा अभ्यास आणि सराव)

गुरूदेव हे भगवद्गीतेत वर्णन केलेल्या ''विभूती योगाचे''अलीकडच्या काळातील एकमेव आणि सर्वमान्य होईल असे उदाहरण होते. भारत यात्रे दरम्यान अथवा आश्रमातील महत्वाच्या प्रसंगी ज्यांना ज्यांना त्यांची प्रबोधनपर व्याख्याने ऐकण्याचा योग आला, त्यांना हे पटेल की गुरूदेवांचा भर विभूती-योगाच्या सरावावर असायचा.

आजवर कानी न पडलेला हा काही योगाचा नवीन प्रकार आहे का, असं तुम्हाला वाटतंय का? गीतेच्या दहाव्या अध्यायात वर्णन केलेला हा कोणता योग आहे याचं तुम्हाला आश्चर्य वाटत असेल? राजयोग, भक्तीयोग, कर्मयोग, आणि ज्ञानयोग यांच्या बरोबरीने गुरूदेवांनी विभूती योग आणून ठेवला. हा ज्ञान-भक्ती योगाचा समन्वयक आहे.

भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णाने दिलेल्या यादीत गुरूदेवांनी काही नवीन विभूती समाविष्ट केलेल्या आहेत. ''Song of Vibhuti Yoga'' या त्यांच्या पुस्तकात ती यादी दिलेली आहे. ''मी संगीतामधील माधुर्य आहे, मी कॉफी मधील सुगंध आहे, मी बर्फातील थंडावा आहे, मी वनातील गूढ शांततेत आहे, मी संत्र्यामधील अर्क (मूलतत्व) आहे.''

भगवंताला गीतेमध्ये हेच अभिप्रेत आहे ना? त्याने विभूती-योगाच्या सरावाला सुरूवात कशी करावी याचा दिशा निर्देश जरूर केलेला आहे, पण यादी पूर्ण केलेली नाही आणि तो स्वत:च हे मान्य करीत आहे.

गुरूदेवांनी स्वत:च या विभूती योगाचा सराव कसा केला? प्रत्येक गोष्टीत त्यांना भगवंताचे अधिष्ठान दिसले. अगदी ''संगीत, शीतपेये'' अशा पंचेंद्रियांना सुखावणाऱ्या गोष्टीतही त्यांना वेगळ्या दिसत नसतं. थाळीतील नेत्रसुखद अन्न त्यांना खुणावत नसे तर त्यांतील भगवंत, जो साऱ्या अन्नपदार्थांना सुपाच्य बनवितो, त्याची आठवण होत असे. संगीत त्यांना विचलित करीत नसे तर त्यांना अलगदपणे सहजावस्थेला (स्वाभाविक आणि सतत टिकून राहणारी अवस्था) नेऊन सोडत असे. भगवंताचे सामर्थ्य त्यांना संगीतात दृगोच्चर होत असे. जंगलातील शांतता त्यांना घाबरवित नसे, ती त्यांना भगवंताचे अस्तित्व वाटत असे. अशा रितीने प्रत्येक गोष्टीत गुरुदेवांना त्यांचा आवडता देव दर्शन देत असे. यालाच सहजावस्था म्हणतात. (क्रमश:)

### POWER OF MUSIC
### MUSIC IS YOGA SADHANA...

Music is a medium of expressing emotion. It kindles love and infuses hope. It has countless voices and instruments. It is in the hearts of all men and women. Music is in the winds and waves. Music is in all things. Sound is the first manifest of the absolute. Supercharged with transcendent soul-force, sound is in all creation, one powerful principle that widely influences and brings under control all manifestations both individual and cosmos.

**SADHANA IS A PROCESS OF AROUSING DIVINE CONSCIOUSNESS AND MERGING INTO IT...**

Spiritual ascent is the process of moving into the divine nature, Daivi-sampada. Sadhana is a process of purification, concentration, proper identification and absorption to arouse the Divine Consciousness; and then to concentrate and get absorbed in That completely. As you steadily advance in Sadhana, this Experience comes by itself.

**- Swami Chidananda**

**GOD IS YOUR BOSOM FRIEND...**

Rest assured that once you turn towards God, He will look after you miraculously and help will come always in time. But you should never take your eyes away from Him. He is your bosom-friend. He is your Father, Mother, your life itself. Remember Him always. Pray to Him fervently. Do not taint your heart by any worldly desire.

**- Swami Sivananda**



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- ❊ एप्रिल २०२३ चा सत्संग १६ तारखेला संपन्न झाला.
- ❊ 'दिव्य जीवन'' या आपल्या मासिक पत्रिकेचा एप्रिल २०२३ चा अंक परिवारातील सदस्यांना हार्ड आणि सॉफ्ट कॉपी तसेच व्हॉट्सअप द्वारे पाठविण्यात आला.

## पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के.
विश्व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



पुणे शाखा
वर्ष १८/अंक ५
मे २०२३

**DEVOTEES AND VEDANTINS ARE EQUALLY STRONG-THEY RELY ON TWO DIFFERENT ASPECTS OF LORD**

It is a common fallacy to suppose that people who follow devotion, who cultivate devotion, who take recourse to prayer, surrender and the Name of the Lord become effeminate, weak and they are not strong. The real devotee fears nothing in this world. His strength is infinite, because his strength is not the strength of individual personality. The source of his strength is Infinity, in which he has established himself. The devotee relies on the Lord; the vedantin relies on the Atman. The Saguna Brahman and the Nirguna Brahman are one.

**- Swami Chidananda**